बॅच २ रिपोर्ट

नमस्कार,

मी प्रतिक्षा..मैत्री संस्थे तर्फे मला मेळघाट ला जाण्याची, तेथील जारिदा आश्रम शाळेतील मुलांना शिकवण्याची संधी मिळाली...१९ ऑगस्ट ते २६ऑगस्ट असा पूर्ण एक आठवडा आम्ही तिथे होतो....माझी पहिलीच वेळ होती मेळघाट ला जाण्याची, ज्या मेळघाट बद्दल फक्त ऐकलंय त्याला प्रत्यक्षात पाहिल्यानंतर मला काय वाटले, शाळेमध्ये आलेले अनुभव, काही आठवणी या सगळ्या मी या रिपोर्ट मधे लिहिल्या आहेत...

१९ ऑगस्ट च्या रात्री आम्ही, म्हणजे मी आणि माझ्या सोबतच्या अजून २ स्वयंसेवक सई आणि नियती पुणे स्टेशन वरून मेळघाट ला जाण्यासाठी अजनी एक्स्प्रेस ने निघालो.दुसऱ्यादिवशी आम्ही बडनेरा स्टेशनला पोहचलो , तिथून अमरावती आणि पुढे परतवाड्याला पोहचलो...

साधारण आम्हाला १ ते सव्वातास लागला अमरावती वरून परतवाड्याला जायला, बस मधे दिगंबर शंकरपाळे हे सद्गृहस्थ भेटले. ते महाराष्ट्र एस टी महामंडळ मध्ये चालक या पदावर कार्यरत आहेत, त्यांनी आम्हाला अमरावती शहराबद्दल बद्दल माहिती सांगितली, आम्ही मेळघाट ला का चाललोय याबद्दल विचारणा केली, आम्ही ही आपल्या मैत्री बद्दल माहिती दिली, मैत्री संस्था काय काम करते, कोणत्या क्षेत्रात करते याबद्दल सांगितले .त्यांनी आम्हाला आसपासची फिरण्यासाठीची ठिकाणं सांगितली, आम्ही खूप साऱ्या विषयांवर चर्चा केली, जस की अमरावती शहर, पाणी पुरवठा, कचरा व्यवस्थापन, शिक्षण ,आरोग्य,तेथील प्रशासकीय आणि सध्याचे असणारे नेते मंडळी..बोलता बोलता परतवाडा आला सुद्धा, परतवाडा हा एक तालुका आहे त्याच दुसर नाव अचलपूर अस ही आहे...दिगंबर दादांचा निरोप घेऊन आम्ही उतरलो..आम्ही येण्यापूर्वी प्रफुल दादा आम्हाला घ्यायला एस टी स्टँड वर आले होते, त्यांच्याशी ओळख झाली आणि मग खऱ्या अर्थाने सुरू झाला परतवाडा ते मेळघाट चा प्रवास....

घटांग चा घाट चढताना जणू स्वर्ग सफारी करतोय असा भास झाला...सगळीकडे धुक्याची चादर पसरली होती, पावसाचे थेंब तर सुखाची अनुभूती देत होते, आम्हाला हुल देऊन मधेच ये जा करत होते, कधी शांत तर कधी खट्याळपणे तो मुक्तपणे फिरणारा वारा आमची गम्मत करत होता..मजल दरमजल करत , कधी धुके, कधी पाऊस तर कधी नुसताच मोकळा रस्ता पाहत , सागवनाच्या गर्दीतून वाट काढत आम्ही मेळघाट मध्ये पोहचलो...

ते निसर्ग सौंदर्य पाहून तर मी पुरती वेडी झाले होते, काही क्षण श्वास ही थांबले असावे ,किती ते देखणं असावं एखाद्याने, कवी मनाला ही लाजवेल असं ते काव्य..त्या निसर्गाने जणू मखमली हिरवा शालू पांघरला होता रंगांची मुक्तपणे उधळण करून तो ही सुखावला असावा, निमुळती ,कोरीव, तर मधेच ओबडधोबड होत जाणारी डोंगराची रांग जणू त्यावर नक्षीच भासत होती...आकाशात पक्ष्यांची भिरभिर, वाटेला हलकेच कोसळणारे छोटे छोटे धबधबे, सोबतीला असणारी वाऱ्याची गुंज,मंद वर्षाव करीत झेपावणारा पाऊस एखाद संगीतच वाटत होत...सागवनाच्या गर्दीतून निघालेली वाट आणि वाढणाऱ्या वेळेसोबत कमी होत जाणारा प्रवास मी खरच एन्जॉय करत होते...

आम्ही मेळघाट मधील चिलाटी या गावात पोहचलो..तिथे आपल्या मैत्रीचा बेस कॅम्प आहे..तेथेच आता आठवडाभर आमचा मुक्काम होता...आम्ही चिलाटी पासून १ तासाच्या अंतरावर असणाऱ्या जारिदा या गावातल्या आश्रमशाळेत शिकवण्यासाठी जाणार होतो .

आम्हाला आठवीच्या मुलांना शिकवायच होत, त्यांना अभ्यासात रुची येईल अशा काही गोष्टी , खेळ घ्यायचे होते. या बॅच ची थीम लेखन व वाचन कौशल्य ही होती मग त्यानुसार आम्ही तिघींनी सोमवार ते शुक्रवार कोणते खेळ घ्याचे, काय शिकवायच , मुलांना काय होमवर्क द्यायचा, त्यांना कोणत्या डॉक्युमेंट्री दाखवायच्या हे आधीच ठरवलं होत त्यामुळे सगळं सोप झालं...
आम्ही सोमवारी शाळेमध्ये गेलो...सर्व मुले आनंदाने आमच्याकडे पाहत होती...त्यांना बहुदा सवय झाली असावी मैत्री मधून नेहमी कोणीतरी येत आपल्याला शिकवतात,खेळ खेळतात , शिकणं सुधा सोप होत...आम्ही आठवीच्या वर्गावर गेलो पण नेमकी त्यांची घटक चाचणी असल्याचे समजल त्यामुळे आम्हाला लगेच तो वर्ग भेटत नव्हता...शिक्षकांनी आम्हाला ९वी किंवा १०वी चा वर्ग घ्यावा असे सुचवलं...

आम्ही १०वी पासून सुरुवात केली...त्यांच्याशी बोललो, १०वी चा अभ्यास कसा सुरु आहे, त्यांना शिकताना कोणत्या अडचणी येतायेत, कोणता विषय सोपा किंवा अवघड जातोय याबद्दल विचारलं...१० वी नंतर लागणारी कागदपत्र, त्यांना उपलब्ध असणाऱ्या संधी, ११वी ला काय निवडावे, कोणता विषय घ्यावा ,१२वी नंतर काय यावर आम्ही बराच वेळ चर्चा केली...काही वेळानंतर मुल ही बोलायला लागली...त्यांना काय बनायचं आहे हे आम्ही विचारलं....कोणी डॉक्टर , कोणी इंजिनिअर ,कोणी पोलिस आणि कोणी फॉरेस्ट गार्ड, तर एकाने मला DJ बनायचं अस सांगितल..त्यानुसार मग मुलांना आम्ही त्यांना द्याव्या लागणाऱ्या परीक्षा, त्याचा अभ्यासक्रम याविषयी माहिती दिली....

१० वी च्या मानाने हे विद्यार्थी थोडे कमी समजदार वाटले ..त्यांना अजून लिहिताना अडचणी येत होत्या, साध्या बाराखडी च्या चुका होत होत्या...त्यांच्यावर अजून काम करण्याचा सल्ला देऊन आम्ही बाहेर पडलो ..आणि दुपारी ८वी चा वर्ग घेतला ..

मग पुढील २ दिवस आम्ही सकाळी ९वी १०वी ला शिकवायचो आणि दुपारी आठवीच्या मुलांना...

नियती ने १०वी चा वर्ग घेतला....

मी आणि सई आम्ही २ ते ३ दिवस ९ वी च्या वर्गावर लक्ष द्यायचे ठरवले ..त्यांच्याशी खूप गप्पा, गोष्टी केल्या...आम्ही गणित, भूगोल, इतिहास, विज्ञान, भाषा, आरोग्य याविषयावर बोललो.नुकत्याच बातम्यांमध्ये असणाऱ्या चांद्रयान ३ यावर प्रश्न विचारले मुलांना याबद्दल सुधा माहिती होती, या मोहिमेबद्दल, यापूर्वी च्या दोन्ही चांद्रयान मोहिमाबद्दल,आपण यान विशेष कोनात का लाँच करतो, त्याची कारणं हे ही त्यांना माहिती होत..त्यांची उत्तरं ऐकून खरच खूप आनंद झाला....
९ वी चा वर्ग त्यातल्या त्यात खूप हुशार होता....त्यांना व्यावहारिक ज्ञान होत...आम्ही त्यांना वेगवेगळ्या पक्षांबद्दल, आपल्या देशाचे प्रधानमंत्री कोण आहेत, तुमच्या गावच्या सरपंच कोण आहेत, तुमचा तालुका कोणता, जिल्हा कोणता याबद्दल बरीच प्रश्नांची सरबत्ती केली....आम्ही त्यांचे खेळ सुधा घेतले जस की शब्दांची जुळवाजुळव, शब्दांचे खेळ, नकाशा जोडणे, गणिताचे पाढे, आणि बरच काही ...

१० वी च्या मानाने ९वी चा वर्ग जास्त चांगला वाटला...त्यांना लिहिता, वाचता, येत होत...प्रमाण भाषा , व्याकरण जरी थोड चुकत असेल तरी बऱ्यापैकी जमत होत...आणि मला सर्वात आवडलेली गोष्ट म्हणजे ते स्वतःहून बोलत होते, आम्हाला प्रश्न विचारत होते, आम्ही जे सांगत होते ते नीट ऐकत होते, आमच्यापेक्षा जर वेगळं मत असेल तर ते ही मांडत होते...
वर्गात गोंद, बलई आणि कोरकू अशी विविध जमाती मधील मुल होती..नंदिनी ज्योती, मयूर, अमोल, कमलेश यांनी तर त्यांच्या भाषेतली गाणी सुधा म्हणून दाखवली ....मी तर मुलांकडून गोंद भाषेत कश्याला काय म्हणतात याचे धडे घेतले..

दुसऱ्या दिवशी आम्ही त्यांना पत्र लिहायला सांगितलं, त्यात त्यांना आवडणाऱ्या गोष्टी, स्वतःबद्दल, त्यांना भविष्यात काय बनायची इच्छा आहे यावर लिहायचं आहे असं सांगितलं...अपेक्षित काहीच नव्हतं परंतु मुलांनी खरंच पत्र लिहून आणली होती....काहीना डॉक्टर बनायचं होत, कोणाला इंजिनिअर, कोणाला पोलिस, कोणाला आर्मी मधे जायच होत, कोणाला शिक्षक, कोणाला नर्स , कोणाला हॅकर, कोणाला गेमर तर कोणाला गायक व्हायचं होत...२ ४ मुलांना ते खेळत असलेल्या खेळात चॅम्पियन व्हायचं होत...वर्गातली बरीच मुलं मुली व्हॉलीबॉल, कब्बडी खेळत होते..एकाने मला गोलाफेक मधे चॅम्पियन व्हायचय अस लिहिलं होत तर दुसऱ्याने मला UPSC बद्दल माहिती हवी आहे असं विचारलं..

कृष्णा या मुलाचे विशेष कौतुक...त्याने पत्रात लिहिले होते की मला माझ्या आयुष्यात काय व्हायचे आहे हे आता जरी माहिती नसले, तरी पण मला स्वतः वर खूप विश्वास आहे की मी नक्कीच काहीतरी चांगल करून दाखवेल...किती ती समज किती तो आत्मविश्वास.....

बाकी काही गोष्टी मधे कमी जरी असली तरी ही मुलं कोणत्या ना कोणत्या खेळात सहभागी होत आहेत..ही त्यांची

एक जमेची बाजू नक्कीच आहे....

त्यांनी लिहून आणलेली पत्र सर्वांनी वाचली, तेव्हा आम्ही राम दादांना त्यांनी मुलांना करिअर मार्गदर्शन करावे असे सुचवले....शुक्रवारी दादांनी मुलांना मार्गदर्शन केले ..१० वी नंतर काय, ११वी १२वी किती महत्वाच्या आहेत, त्यांच्याच गावातल्या काही शिकून मोठे झालेल्या लोकांची उदाहरण देऊन त्यांना ते पटवून दिलं....शेवटच्या दिवशी मी आणि सई ने मुलांसोबत फोटो सुधा काढले ...

आठवी चा वर्ग...

सोमवार ते बुधवार पर्यंत आम्हाला दुपार नंतर आठवी चा वर्ग मिळत होता...वर्गात ७५ च्या आसपास मुल होती .. ठरवल्याप्रमाणे आम्ही तिघी ही त्यांच्याशी बोलत होतो, वेगवेगळे खेळ घेत होतो.....

मला तर तिथे गेल्यावर समजल माझ्या हिंदी भाषेची पुरती वाट लागलेली आहे आणि मला नक्कीच त्यावर काम करण्याची गरज आहे ..मला काहीच अनुभव नव्हता, यापूर्वी मी १०वीत असताना शाळेमध्ये शिक्षक दिनी जे शिकवलं ते शेवटच होत त्यामुळे एवढ्या सगळ्या मुलांना शिकवण्याचे कसब माझ्यात नक्कीचं नव्हतं....नियती जितकी उत्तम डान्सर आणि कलाकार आहे तितकीच किंबहुना त्याहून उत्तम शिक्षक आहे ..मी तिच्याकडून खूप काही शिकले....मुलांना कस शिकवायच , त्यांना कस हॅण्डल करायचं, त्यांनी पूर्णवेळ लक्ष देण्यासाठी काय करायचं हे नक्कीच मी तिच्याकडून शिकले ... मुलांशी बोलता बोलता मला ही शिकवण, हिंदी मधे बोलणं आता जमायला लागलं ....

नियती ने संयुक्त अक्षरे, मुळाक्षरे, जोडशब्द हे खेळ घेतले ..मी शब्दांची जुळवाजुळव करून अर्थपूर्ण शब्द बनवणे, शेवटच्या अक्षारापासून नवीन अर्थपूर्ण शब्द बनवणे असे , नकाशा बनवणे असे खेळ घेतले आणि सई ने शब्दकोडे, Treasure Hunt चे खेळ..

लिखाण वाचन याबरोबरच ऐकणं किती महत्वाचं आहे हे पटवून दिलं....Chinese whishper हा खेळ खेळताना नीट ऐकणं , ते दुसऱ्याला समजेल असं सांगणं किती महत्वाचं आहे हे देखील त्यांना समजलं....गोंधळ गडबड करून काही होणार नाही तर शांतपणे शिक्षक जे शिकवतात ते ऐकून , लिहिता आल पाहिजे हे सांगितलं...स्वतः प्रयत्न करून प्रश्नांची उत्तर लिहिता आली पाहिजेत ...जास्त गरज वाटलीच तर एखाद्या मित्राची किंवा मैत्रिणीची मदत जरूर घ्या हे ही सांगितलं...
आम्ही रोज आधीच्या दिवशी शिकवलेल्या गोष्टींची उजळणी घेत होतो ...मुलांना ग्रंथालयातील पुस्तक दिली, विशेष म्हणजे शेवटच्या दिवसापर्यंत मुलांनी ती पुस्तकं वाचली होती, त्यांना ती आवडली सुद्धा होती.....

आम्ही गुरुवारी आपल्या थीम ला अनुसरून काही व्हिडिओ दाखवायचे ठरवल होत...मी स्वातंत्र्य कस मिळालं, त्याला किती महत्त्व आहे यावर , कुंभे धबधबा, राजस्थान राज्य, राष्ट्रीय चिन्ह, सूर्यमाला, नंदा देवी शिखर या विषयांवर काही व्हिडिओ आणल्या होत्या... सई ने ट्रेकिंग, क्लाइंबिंग यावर तर नियती ने मुलांना महाराष्ट्र राज्याच्या काही निवडक आणि विशेष असणाऱ्या गोष्टी यावर व्हिडीओ दाखवल्या...व्हिडिओ संपल्यावर त्यांना प्रश्न विचारले...त्यामुळे कोणी किती मन लावून ते पाहिलं हे समजल...

शेवटच्या दिवशी ओंकार आला....तो जेव्हा शाळेमध्ये येत होता तर पोरांनी अचानक दंगा, गोंधळ करायला सुरुवात केली....किती आतुर होऊन ते आम्हाला प्रत्येक दिवशी विचारायचे ओंकार दादा केव्हा येणार आहे, आम्हाला तो खूप आवडतो , तो आम्हाला चांगल शिकवतो, आम्हाला ओरडत नाही , कितीही वेळा विचारलं तरी समजावून सांगतो आणि अजून खूप काही.....काही क्षण आपल्याला ही हेवा वाटावा एवढं प्रेम , आपुलकी त्या मुलांना ओंकार बद्दल होती ते पाहून खूप आनंद झाला ...
ओंकार ने सुद्धा काही गोष्टी घेतल्या, मुलांना गणिताची कोडी सोडवायला दिली, समजावून सांगितली, त्यांना आवडणारे फुगे घेऊन तो आला होता मग काय एकच काय तो दंगा प्रत्येकाला एक फुगा ,बिस्कीट, चॉकलेट आणि खूप सार प्रेम मिळालं...

सई ने Treasure Hunt खेळाची कल्पना सुचवली होती मग शेवटच्या दिवशी तो ही खेळ घेतला... प्रत्येकी १० जणांची अश्या आम्ही ७ टीम बनवल्या त्यात १० क्लू होते...त्यांना ५ दिवस जे जे शिकवलं होत ,किंवा शाळेच्या परिसरातील असणाऱ्या गोष्टी याबद्दल क्लू लिहीले होते ....जितका वेळ मुलांना ते क्लू शोधायला नसेल लागला त्यापेक्षा जास्त वेळ आम्हा तिघींना ते प्रत्येक ठिकाणी लावण्यात गेला, त्यांच्यापेक्षा जास्तच पळापळ झाली आमची ....
मुलांना आम्ही १ तासाचा वेळ दिला होता आणि आश्चर्य म्हणजे त्यांनी ते अवघ्या १०मिनिटात शोधून काढले....नवलच ते...... मग जी टीम जिंकली होती त्यांना गिफ्ट दिले , दिलेली पुस्तक जमा करून घेतली आणि शेवटी फोटोज् काढले.....

विशेष....

माझी पहिलीच वेळ होती जरिदा शाळेत येण्याची, मुलांना शिकवण्याची त्यामुळे मला माहिती नव्हत की त्यांना कितपत माहिती आहे, त्यांना कोणत्या विषयाची अडचण आहे पण पहिल्यादिवशी आणि शेवटच्या दिवशी पाहिलेली मुल नक्कीच वेगळी भासली....त्यांच्यात सुधारणा दिसली ...ज्या मुलांना ग घ , च ज, क्ष श ष, ह द, ळ ड यामध्ये कन्फ्युजन होत होते ती निदान आता ते बरोबर लिहू आणि वाचू शकत होती...
जी मुलं फक्त शिक्षकांनी फळ्यावर काय लिहिलंय ते उतरून काढत , परीक्षा सुद्धा पुस्तक पाहून देत आहेत ,ती आता स्वतः प्रयत्न करत होती, स्वतः शब्द अक्षर ओळखत होती...जोडशब्द तर त्यांना असे जमत होते की खूप सारा सराव करून आलेत...
नियती आणि ओंकार यापूर्वी येऊन गेलेत त्यामुळे त्यांना मुलांमधे झालेला बदल नक्कीच जाणवला असेल ...
रोज वेगवेगळ्या ॲक्टिविटी घेत असताना वर्गातली काही हुशार, चुणचुणीत, बडबडी मुल समजली रोशन, ईशान, अनुष्का, इंद्राणी, वैष्णवी, भाग्यश्री ,देवेंद्र, आयुशी , नंदिनी , राजनंदीनी, लक्ष्मी, रेश्मा, मुकेश, सरस्वती, धीरज, श्याम, गौरव , राम आणि बाकी सगळेच...

हा अट्टाहास मुळीच नव्हता की मुलांनी बाकीचे जे करतात ते केलच पाहिजे, त्यांनी खूप अभ्यास करून सरकारी नोकऱ्या केल्या पाहिजे, डॉक्टर इंजनिअर झालच पाहिजे, पण होती ती एक माफक अपेक्षा की त्यांना जगताना काही अडचण नाही आली पाहिजे, कोणी उगाच त्यांना फसवल नाही पाहिजे इतकं किमान लिहिता वाचता त्यांना आलच पाहिजे...जिथे वाचल्याशिवाय किंवा लिहिण्यावाचून जास्त काही अडणार नाही तिथे या अपेक्षा म्हणजे खूपच सामान्य आहेत....

शेवटच्या दिवशी शाळेतून पाय निघता निघत नव्हता...कस बस त्यांचा निरोप घेऊन आम्ही निघालो तर ती मुलं आम्हाला गाडी पर्यंत सोडायला आली होती...

Suggestions :

आम्ही ५ दिवस जरिदा आश्रमशाळेत जात होतो..मधल्या वेळेत तेथील शिक्षकांशी आमचे बोलणे झाले...शाळेचे मुख्याध्यापक कानेरकर सर , झांबोळे सर, उल्हे सर, देशमुख मॅडम, पठोरकर मॅडम, सावलकर सर यांच्याशी जेव्हा बोलणं झालं तेव्हा एकूणच त्यांच्या सुध्दा काही तक्रारी आहेत हे लक्षात आलं जस की शाळेच्या बदललेल्या वेळेबद्दल, मुलांच्या गैरहजेरी बाबत, आणि व्यवस्थापनेबाबत...नाण्याची दुसरी बाजू सुधा आपण जाणून घेतली पाहिजे हे जाणवलं ..

पण एक गोष्ट आवर्जुन सांगावीशी वाटतेय की मुलांना एक चांगला शिक्षक भेटला तर नक्कीच त्यांच्यात बदल होऊ शकतो , ९वी चा वर्ग हे त्याचे एक उत्तम उदाहरण आहे आणि तो त्यांना पठोरकर मॅडम आणि सावलकर सर यांच्या रूपात भेटला..त्यांना मुलांची नक्कीच खूप जास्त काळजी आहे..

नुकतीच शाळेची वेळ बदलली असून ती सकाळी ८ वाजता केली आहे ..जी मुलं लांबून येतात ते सकाळी लवकर यायचं म्हणून डबा न घेताच येतात त्यामुळे ती सकाळ पासून ते शाळा सुटेपर्यंत उपाशी असतात....जी मुलं हॉस्टेल वर रहातात तिथे एकाच वेळी एवढ्या सगळ्या मुलांना वॉशरूम आणि टॉयलेट वेळेत वापरायला भेटत नाही

त्यामुळे नाईलाजाने मुल पारुशी शाळेत येतात... हॉस्टेल मध्ये कमी जागेत जास्तीत जास्त मुल असल्यामुळे स्वच्छतेअभावी खरूज सारखे त्वचेचे रोग सहजरीत्या पसरू शकतात आणि ते पसरतात सुधा..

आम्ही मुलांशी हॉस्टेल, त्यांना मिळत असलेले जेवण याबद्दल विचारणा केली..हॉस्टेल ची अवस्था तर खूपच खराब आहे ..धूळ, घानीच साम्राज्य तिथे पसरलेलआहे आणि नवल तेव्हा वाटलं जेव्हा हॉस्टेल च्या मागच्या बाजूने खळखळ वाहणारा  स्वच्छ नाला असून त्याच्या काही अंतरावर असणाऱ्या हॉस्टेल मध्ये पाण्याची कमी आहे...
जिथे जेवणाचा हॉल आहे ती जागा सुद्धा म्हणावी तितकी स्वच्छ नाहीये....आजूबाजूला अन्न सांडले होते, तिथेच पाण्याची टाकी, त्या अन्नाचा कुबट वास सुटला होता, तिथेच कावळे येत होते असे चित्र होत ते...

एक चांगली गोष्ट सांगायची असेल तर ती शाळेचं मैदान आणि व्यायामशाळा आहे...त्या दोन जागा चांगल्या ठेवल्या होत्या....शाळा संपल्यावर मुले रोज तिथे सराव करतात...कब्बडी, खो खो आणि व्हॉलीबॉल साठी वेगळे भाग केलेले आहेत....

आम्ही काही गोष्टी निरीक्षण केल्या तेव्हा समजलं की जी मुलं घरी राहतात , घरून रोज शाळेला येतात ती हॉस्टेल ला राहणाऱ्या मुलांपेक्षा थोडी हुशार आहेत...
जिथं मुलांना अगदीच बेसिक असणाऱ्या गोष्टींची मारामार असेल तर ते अभ्यासावर लक्ष तरी कस केंद्रित करणार ...
मला स्वतःला असे वाटते की आपण मुलांना स्वच्छतेची सवय नक्कीच लावू शकतो ..त्यांच्याकडून महिन्यातून एकदा पूर्ण हॉस्टेल ची साफसफाई करून घेऊ शकतो ...शाळा सुद्धा प्रत्येक आठवडा किंवा दिवस ठरवून स्वच्छ करता येऊ शकते....

काही आठवणी :

आम्ही शाळेत गेलो त्या दिवशी नेमकी नागपंचमी होती, तर आम्ही मुलांना विचारलं की आज काय विशेष गोष्टी करतात इकडे, म्हणजे पूजा किंवा जेवणामध्ये काही तर तेव्हा कळालं की नागाची पूजा करतात सोबतच प्रसाद म्हणून गोड पुरी, डाळ , गुज्जो( रव्याची करंजी) बनवतात ....आम्हाला गुज्जो हे काय समजलच नाही तर दुसऱ्या दिवशी आठवीतल्या वैष्णवी ने खास आमच्यासाठी गुज्जो आणल्या होत्या..किती ते प्रेम ....

मी आणि सई जेव्हा ९वी च्या वर्गात शिकवत असायचो तेव्हा आमचा भाषेचा थोडा गोंधळ व्हायचा , तर आम्हाला सोप जावं म्हणून नंदिनी आणि ज्योती ने न मागता आम्हाला एक पुस्तक दिलं ...त्यात कोरकू भाषेचं हिंदी आणि मराठी मधे भाषांतर केलेलं होत ..आम्हाला ते पुस्तक म्हणजे एक टोकन ऑफ अप्रिशियेशन वाटलं...त्यांनी आम्हाला स्वीकारलं अस वाटल....

बुधवारी आम्ही चुरणी गावच्या बाजारात गेलो...बाहेरून येणाऱ्या गोष्टींचा एक कोण दुआ असेल तर तो हा बाजार...बाजारात नेहमीच्या वस्तू होत्या पण आम्हाला नवीन होत्या त्या तिथल्या डाळी, बरबटी( कडू वाल सारखे), कुटकी (भगर किंवा वरई सारखी).

राम दादांसोबत आम्ही चिलाटी गावात फेरफटका मारला..ते साधं जीवन सुद्धा पूर्ण आणि आपल्यापेक्षा सुखी असल्याच्या पाऊलखुणा तिथेच दिसत होत्या....गावातून फिरताना सुमरती आजी भेटल्या, मग त्यांच्यासोबत सुद्धा एक फोटो घेतलाच मी....राम दादांकडून मैत्रीच्या मागील २५ वर्षाच्या प्रवासाबद्दल ऐकलं तेव्हा जाणवलं की जे लोक मैत्री च्या लोकांना पाहून पळत होते, लपाछपी करत होते ते आता स्वतः समोर येऊन रामराम (अभिवादन) करत होते...एक संस्था , एक विचार, एक प्रयत्न खरच खूप काही बदल करू शकतो याची प्रचिती आली.

२५ ऑगस्ट ला बेस कॅम्प वर खूप सारी मंडळी जमली होती...सर्वांनी आपापली ओळख करून दिली, मैत्री मधे कोण काय काम करतात हे ही सांगितलं....बाबुलाल दादा यांनी शेळी पालन, कुंजीलाल दादांनी कुक्कुटपालन, सखाराम दादांनी शेती विषयक, दिलीप दादा व सुमिता ताईंनी आरोग्य मैत्री बद्दल आणि अनिल दादांनी धडक मोहीम

बद्दल माहिती दिली तर राम दादांनी मैत्रीचा २५ वर्षाच्या प्रवासाबद्दल माहिती दिली...आम्ही बऱ्याच गोष्टींवर चर्चा केली...

निघायच्या दिवशी एक धावती भेट रुईपठार गावाला देऊनच आलो ..तिथे केलेला शेत तळ्याचा आणि आंतरपिकांचा प्रयोग पाहून आलो...

शेवटी पण तितकीच महत्वाची व्यक्ती म्हणजे श्यामकली ताई...आठवडा भर आमच्या खाण्यापिण्याची खूप काळजी ताई ने घेतली..घरची आठवण सुद्धा येऊ दिली नाही....स्वतः जरी शिकली नसेल तरी ही तिच्या मुलांना ती शिकवते याचा मला फार आनंद झाला...
आमच्यासाठी खास अश्या गोड पुऱ्या सुधा बनवल्या होत्या ताई ने....अन्नपूर्णा सुखी भव :

निघायचा दिवस आला...सगळे आम्हाला गाडी पर्यंत सोडायला आले होते...हेच ते चेहरे जे मी गेले आठवडा भर पाहत होते त्यांची रजा घेत होते...गाडी मुख्य रस्त्याला लागल्यावर साऱ्या गोष्टी आठवायला लागल्या ....प्रफुल दादांचे किस्से ऐकत, धमाल मस्ती करत आम्ही परतीचा प्रवास करत होतो...वाटेत मध्यप्रदेश मधे जाऊन आलो... घटांग चा सुप्रसिद्ध असा डाळवडा खाण्याचा मोह ही आम्ही पूर्ण केला ... घाट उतरल्यावर रस्त्याच्या डाव्या बाजूला काही स्मृतीशिल्पे सुद्धा पहिली..शेवटचं काय ते मेळघाटच सुंदर अस रुपड जितकं डोळ्यात साठवता येत होते तितकं साठवून आम्ही परतवाड्याला आलो...

रिकाम्या हाताने आलेली मी जाताना सोबत आठवणींचा भला मोठा पिटारा घेऊन चालले होते...नवीन मैत्रिणी बनवल्या होत्या, नवीन लोक आयुष्यात आली होती, सगळ्यात बेस्ट जर कोणती गोष्ट असेल तर तो होता मुलांसोबत घालवलेला वेळ...आपल्या आयुष्यात एका आठवड्याचा इतका फरक होत नसेल पण त्या मुलांच्या आयुष्यात नक्कीच मोठा बदल होत असेल ..हा विचारच मनाला आनंद देऊन गेला...मुलांकडून ही मी खूप काही शिकले..

जगण्याची पद्धतच बदलून गेली..गरजा किती माफक आणि कमी असाव्या याची समज आली...आपल्याला नेहमी वाटत असतं की आपण म्हणजे मुख्यप्रवाह आहोत  पण कदाचित ते आदिवासी लोक जगतायेत तो ही मुख्यप्रवाह असू शकतो आणि आपण बाहेरचे ( माझ स्वतःच अस मत आहे )...खूप आनंद घेऊन मी घरी आले ..

मला मैत्री ने जर संधी दिली तर मला पुन्हा पुन्हा मेळघाट ला जायला नक्कीच आवडेल ..

Thank You ...